कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्प संच क्र. ६ च्या सुधारीकरणास व आधुनिकीकरणासाठी महानिर्मिती कंपनी मर्यादित यांना प्राप्त झालेल्या कर्जाच्या रक्कमेच्या समायोजनाबाबत वित्तीय वर्ष २०१८-१९

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. पुरमा-२०१८/प्र.क्र.१०७(१)/ऊर्जा-३
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
दिनांक : - ३० मार्च, २०१९

<u>संदर्भ</u> : - १) शासन निर्णय,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्र. निधिवि-२०१८/प्र.क्र. ९५/ऊर्जा-३, दि. १४ नोव्हेंबर,२०१८
२) शासन निर्णय,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्र. निधिवि-२०१८/प्र.क्र. ७६/ऊर्जा-३, दि. २ जानेवारी, २०१९.
३) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दि. ०२/०४/२०१८.
४) शासन परिपत्रक वित्त विभाग,क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि.२५ जानेवारी,२०१९
५) महालेखापाल कार्यालयाचे अ.शा.पत्र क्र. D.O.No.ACII/CAORB/CH-१/२०१८-१९/७२३, Date २०/०२/२०१९.
६) महानिर्मिती कंपनीचे पत्र क्र. CMD/MSPGCL/GOM/No.०९८६६, दि.१६/०८/२०१८.
७) महानिर्मिती कंपनीचे पत्र क्र. CMD/MSPGCL/GOM/No.१४८३१, दि.३१/१२/२०१८.

<u>प्रस्तावना</u> : -

कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्प संच क्र. ६ (सुधारीकरण व आधुनिकीकरण) जागतिक बँकेच्या सहकार्याने उभारण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी सन २०१८-१९ या वर्षाकरिता मागणी क्र. के-११ योजना सांकेतांक (६८०१०६४७) अंतर्गत मूळ अर्थसंकल्पिय तरतूद रु. ३० कोटी इतकी होती. तद्नंतर हिवाळी अधिवेशनामध्ये रू. ६९ कोटीची पुरवणी मागणी मंजूर झाली आहे. अशाप्रकारे सदर लेखाशिर्षाअंतर्गत सूधारित अंदाजात एकूण तरतूद रू. ९९ कोटी मंजूर आहे.

सदर मंजूर तरतूदीच्या अनुषंगाने संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये रु. ९६,१६,०००/- (रूपये शाहन्नव लाख सोळा हजार फक्त) इतकी रक्कम निरंक रक्कमेचे देयक अधिदान व लेखाधिकारी कार्यालयास सादर करून समायोजित करण्यात आली होती. त्याचप्रमाणे संदर्भिय शासन निर्णय क्रमांक २ अन्वये महालेखापाल कार्यालयाने निलंबन लेखाशिर्षाखाली दर्शविलेली रक्कम रू. १४,१४,७४,०००/- (रूपये चौदा कोटी चौदा लाख चौ-याहत्तर हजार फक्त) पुस्तकी समायोजनाने महालेखापाल कार्यालयाच्या स्तरावर समायोजित करण्यात आली आहे.अशाप्रकारे सदर लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१८-१९ करिता एकूण रू. १५,१०,९०,०००/- (रूपये पंधरा कोटी दहा लाख नौवद हजार फक्त) इतकी रक्कम समायोजित करण्यात आली आहे. आता जागतिक बँकेकडून महानिर्मिती कंपनीस केंद्र शासनामार्फत परस्पर प्राप्त झालेली व राज्याच्या एकत्रित निधीत जमा

झालेली कर्जाची रक्कम रू. २०,५५,०८,०००/-(रूपये वीस कोटी पंचावन्न लाख आठ हजार फक्त) महानिर्मिती कंपनीस रोखीने वितरित न करता जलसंपदा विभागास महानिर्मिती कंपनीकडून भाडेपट्टीपोटी देय असलेल्या रक्कमेपोटी पुस्तकी समायोजनाने वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

महानिर्मिती कंपनीच्या कोराडी युनिट क्र. ६ (आधुनिकीकरण व नुतनीकरण) प्रकल्पास केंद्र शासनाच्या पुढाकाराने जागतिक बँकेकडून महानिर्मिती कंपनीस मंजूर झालेल्या व राज्याच्या एकत्रित निधीत जमा झालेली कर्जाची रक्कम रु. २०,५५,०८,०००/- (रुपये वीस कोटी पंच्चावन्न लाख आठ हजार फक्त) इतकी रक्कम महानिर्मिती कंपनीस रोखीने वितरीत न करता पुस्तकी समायोजनाने वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली कर्जाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

३. वरील बाबींचा खर्च "मागणी क्र. के-११ ६८०१ वीज प्रकल्पासाठी कर्ज,२०५ पारेषण व वितरण,(००) (०५) कोराडी ऊर्जा प्रकल्पासाठी महानिर्मिती कंपनीस कर्ज (कार्यक्रम) ५५ कर्जे व आगाऊ रक्कमा (६८०१०६४७) या लेखाशिर्षा खाली खर्ची टाकावा व तो सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदी मधून समायोजित करण्यात यावा.

४. वरील मंजूर झालेल्या कर्जाची रक्कम महानिर्मिती कंपनीस रोखीने वितरीत न करता खाली दर्शविल्याप्रमाणे महानिर्मिती कंपनीकडून जलसंपदा विभागाच्या शासनास येणे असलेल्या भाडेपट्टीच्या रक्कमेपाटी वसूल करण्यात यावी आणि खाली नमूद केलेल्या जमा लेखाशिर्षाखाली समायोजनेव्दारे समायोजित करण्यात यावी.

अ. क्र.	तपशिल	रक्कम रुपये	जमा लेखाशिर्ष
१	वित्तीय वर्ष २०१८-१९ या वर्षातील जागतिक बँकेच्या कर्जाच्या रक्कमेपोटी समायोजित करावयाची रक्कम	रू. २०,५५,०८,०००/-	०८०१ वीज २२ इतर जमा रक्कमा २२ (०१) इतर जमा रक्कमा महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून येणारी भाडेपट्टीची रक्कम (०८०१०१६३)
	एकूण	**रू. २०,५५,०८,०००/-**	

५. शासनास उपरोक्त प्रमाणे येणे असेलेली रक्कम रू. २०,५५,०८,०००/- (रूपये वीस कोटी पंचावन्न लाख आठ हजार फक्त) चे निरंक रक्कमेचे देयक अधिदान व लेखाधिकारी कार्यालयास सादर करावे. सदर कर्ज हे EAP कर्ज असल्याने त्याचे कर्ज परतफेडीचे विवरणपत्र BEAMS (महाऋण) या आज्ञावलीत तयार होत नसल्याने तसे देयकात प्रमाणित करण्यात यावे.

६. सदर देयकाच्या समायोजनासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव (ऊर्जा-३) व नियंत्रण अधिकारी म्हणून सह सचिव (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

७. महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०१७/ परिपत्रक क्र. अर्थसंकल्प, २०१८ / प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/०४/२०१८ मधील परिच्छेद ७ मधील अट क्र.१ ते ९ या अटी लागू होत नाही. परंतू त्यासोबतच्या परिशिष्टातील अट क्र.४ अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या बाह्यसहाय्यित (EAP) कार्यक्रमाच्या खर्चास नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेची अट लागू होत आहे. या लेखाशिर्षाखाली होणारा खर्च हा सुधारित अंदाजाच्या मर्यादेत आहे. सदर निधी वितरणाचा अधिकार प्रशासकीय विभागास असल्याने त्यास अनुसरून निधी वितरण प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अधिकारात वितरीत करण्यात येत आहेत.

८. तथापि, सदर निधी बाह्यसहाय्यित कर्ज असल्याने सदर शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक. ३२५/१४६१ दिनांक १९/३/२०१९ तसेच वित्त विभागाचा अनौपचारिक क्र. ८८/१९/व्यय-१६, दि. २७/३/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०३३०१६००५२८४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nitin Gaikwad

Digitally signed by Nitin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5892c3fd8686c1921e784a3faa9888d155b03f5591ce11b21a1b5006247f6972, serialNumber=2276ac762af372d872c2f01d5bb5086166f4a6e20a1bdf9762d556a93f5d118e, cn=Nitin Gaikwad
Date: 2019.03.30 16:03:00 +05'30'

(नितीन गायकवाड)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत -:

१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विदयुत सुत्रधारी कंपनी मर्यादित, हाँगकाँग बिल्डींग,४ था मजला ,एम.जी .रोड, फोर्ट, मुंबई-२
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई-४०००२०.
४. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई-४०००२०.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -२, नागपूर.
६. मा. विरोधी पक्ष नेता,विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ,मुंबई,
७. अधिदान व लेखा अधिकारी, (अराप / रालेवि-१), मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
९. वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१३ / साधनसंपत्ती /साऊ / व्यय-१६, ऋण व हमी कार्यासन) मंत्रालय, मुंबई, ३२
१०. निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.